Review Of Research
Vol. 2, Issue. 12, Sept. 2013
ISSN:-2249-894X
Available online at www.reviewofresearch.net

ORIGINAL ARTICLE

# डॉ. आंबेडकरांचे संघटनविषयक विचार

प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड

विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

*प्रस्तावना :*

शतकानुशतके अस्पृश्यजनतेवर होत आलेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी अस्पृश्य समाजाने एकत्र येऊन आपल्या समस्यांवर, एकत्र येऊन जातिबहिःष्कारातून होणाऱ्या मुक्ततेविषयी चिंतन करावे या विषयी डॉ. बाबासाहेबांनी सर्व समाजाला जागृती यावी याविषयी विविध चळवळी राबवून दिशा देण्याचा प्रयत्न केला. त्यांचे संघटन वाढावे यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. भारतीय समाजव्यवस्थेतील वर्णव्यवस्थेला छेद द्यावयाचा असेल तर अस्पृश्यसमाज संघटीत झालाच पाहिजे व अस्पृश्यतेविरुद्ध लढा तेव्हाच यशस्वी होऊ शकतो याविषयी जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी करून दिली. भारतीय जीवनाच्या आमुलाग्र परिवर्तनात त्यांना विचार, धर्म व समाजव्यवस्था अशी त्रिविध परिवर्तन अभिप्रेत होती. प्रस्थापित हिंदू समाजव्यवस्थेकडून अत्यंत निर्घृणपणे दडपलेल्या दबलेल्या अस्पृश्य समाजाच्या सर्वांगीण उन्नती ते उन्नतीसाठी आयुष्यभर ढत राहिले. तरी त्यांच्या अस्पृश्यतेविरोधी लढ्याची अंतिम परिणती मानवी स्वातंत्र्य, समता व प्रतिष्ठा यांच्या प्रस्थापनेत होत होती. त्यांच्या अस्पृश्यतेविरोधी विचार धर्म, वर्ण–जाती, वर्गसत्ता, मालमत्ता इ. संकल्पना व संस्था यांच्या चिकित्सा विचारात विकसीत होतो. प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या या आधारभूत प्रवृत्तीच्या अनिष्ठ व अन्याय स्वरुपाचे निर्मूलन करून नव्या मूल्यावर आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्याचे दिशादर्शकाचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर करीत होते.

*शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा :*

डॉ. बाबासाहेबांच्या मते राजकीय सत्ता हे व्यवस्था परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. भारतीय समाजाच्या सत्ता परिघात अस्पृश्य समाजाला शतकानुशतके स्थान नसल्यामुळे तो समाजाचा अराजकीय भाग म्हणून सत्ता वंचितच राहिला. अस्पृश्य समाजाची खरी समस्या सत्ता संपादनाची आहे, हे त्यांनी हेरले होते. त्यामुळे अस्पृश्यांच्या प्रश्नाला राजकीय परिणाम मिळाल्यास अस्पृश्य समाजाच्या राजकीयकरणाची प्रक्रिया सुरू करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा असा संदेश त्यांनी अस्पृश्य समाजाला दिला होता. गुलामीच्या शृंखला जर तोडावयाच्या असतील तर सत्ता व संपत्तीच्या प्रवाहात अस्पृश्य समाजही सहभागी होऊ शकतो असा आत्मविश्वास त्यांनी अस्पृश्य समाजाला दिला होता. मालमत्ता किंवा संपत्ती संबंधाने अथवा उत्पादन संबंधाने सत्ता संबंध दृढ होतात हे मार्क्सवादीमत जरी खरे असले तरी भारताच्या सामाजिक विषमतेच्या संदर्भात घटनात्मक लोकशाहीच्या आधारे सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा यांच्या प्रवाहात आपल्या समाजाला उतरता येईल असे त्यांना वाटत होते. समाजव्यवस्था सत्ता व संपत्तीच्या सामाजिक संबंधाकडून प्रामुख्याने आकारीत होते. हा सामाजिक जीवनविषयक भौतिक दृष्टीकोन त्यांच्या विचारात दिसून येतो.

*सत्ता संपादन राजकारणाचे उद्दिष्टे :*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, राजकीय सत्ता ही सर्वागीण सामाजिक प्रगतीची गुरुकिल्ली आहे. अस्पृश्य समाजाला सत्ता संपादन करण्याशिवाय गत्यंतर नाही. सत्ता संपादन हेच राजकारणाचे उद्दिष्त्य असते. अस्पृश्य समाजाच्या राजकीय जाणीवा राजकीय कृतीसाठी कार्यप्रवण करणे व स्वतःच्या संघटीत शक्तीतून सत्ता निर्मितीत सहभागी होणे ही अत्यंत निकडीची बाब त्यांना वाटत होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सत्ता संघटनांचा स्वतंत्र सिद्धांत मांडलेला नसला तरी त्यांना हेच अपेक्षित होते की, व्यवस्था परिवर्तनाचे समाजाचे सामर्थ्य किंवा क्षमता म्हणजे सत्ता होय. शोषितांनी जागृत होऊन संघटीत होऊन सत्ता प्राप्त केली पाहिजे. मानवमुक्तीचे क्रियाशील, व्यापक स्वरुपाचे उघड राजकारण केले पाहिजे. त्यांच्या राजकारण संकल्पनेला नैतिकतेचे, व निर्मलतेचे अधिष्ठान आहे. राजकारण हे व्यक्तीनिष्ठ नसावे ते मूल्यनिष्ठ असावे, राजकारण हे व्यक्तीगत स्वार्थ, भोग व उत्कर्ष यासाठी न करता समाजासाठी केले पाहिजे. असा त्यांचा कटाक्ष होता. कटकारस्थानाचे, दहशतीचे व बदमाशीचे राजकारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पूर्णतः अमान्य होते. प्रबुद्ध व प्रगल्भ आणि जबाबदार राजकारणाचे तितकेच सक्षम नेतृत्व अस्पृश्य समाजातून आले पाहिजे. अशी त्यांची अपेक्षा होती. तरच हा समाज मुक्ती व विकास यांचे सत्तेचे आव्हान राजकारण पेलू शकेल. आणि अपेक्षित व्यवस्था परिवर्तन सत्तेच्या सहाय्याने होऊ शकेल.

*शिक्षण, संघटन व संघर्श मार्गाचा स्वीकार :*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सत्तेची ही संकल्पना मांडल्यानंतर अस्पृश्य समाजाने शिक्षण, संघटन व संघर्षमार्गाचा अवलंब केला पाहिजे यावर भर दिला. शिक्षणाने, प्रबोधनाने अकर्माच्या जीवनविषयक सामाजिक जाणीवा व्यक्तीगत सुप्तगुण, क्षमता व कौशल्ये वाढू शकतात. ज्ञानाच्या विचारांच्या व भावनाच्या कक्षा रुंदावतात. दलित समाजात शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे म्हणून तो हयातभर प्रयत्नशील राहिले,

